महाराष्ट्र टाइम्स

# सुंदर माझे घर

Times Classified Initiative
in association with
भारतीय स्टेट बँक
प्रत्येक भारतीयाची बँक

मुंबई, ११ जानेवारी २०१३

## आरोग्यदायी निवास

घर म्हणजे केवळ विटामातीचं बांधकाम नसतं तर ते त्यात राहणाऱ्या लोकांच्या स्वप्नाचंही बांधकाम असतं. त्यात त्यांनी आपल्या इच्छाआकांक्षा ओतलेल्या असतात. अशा घरात राहताना त्यांना सुखसमृद्धी लाभणार नसेल तर अशा घरावर केलेला सारा खर्च अनाठायीच ठरतो. पण हेच घर घरातल्या लोकांच्या आरोग्याचा विचार करून बांधलं तर त्याचा निश्चितच चांगला फायदा होतो. घराच्या या संकल्पनेला 'आरोग्यदायी घरं' किंवा 'नैसर्गिक घरं' म्हणतात.

पूर्वी घर घेताना केवळ राहण्याची गरज भागवण्याचाच विचार केला जाई. पण आता या मानसिकतेत बराच बदल झाला आहे. राहण्यासोबतच आरोग्यदायी व त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे सुरक्षेला महत्त्व येऊ लागलं आहे.

भारतीय स्टेट बँक
प्रत्येक भारतीयाची बँक

सध्या जमाना हा 'ग्रीन' अर्थात पर्यावरणानुकूल घरांचा आहे. त्यामुळे बांधकाम व्यावसायिक आपल्या ग्राहकांना अशा इको-फ्रेंडली घरांचे पर्याय देत आहेत ज्यात आरोग्याला घातक असणाऱ्या विषारी घटकांचा कमीतकमी वापर केला जातो. घराच्या बांधकामात, रेखाटनात इतकंच नव्हे तर अंतर्गत सजावटीतही अशा आरोग्यदायी व पर्यावरणानुकूल घटकांचा विचार व वापर केला जातो जे वर्षानुवर्षं ऊन, वारा आणि पावसाशी लढा देत टिकून राहतील.

इमारतीची संरचना, बांधणी आणि देखभालीत अधिकाधिक नैसर्गिक स्रोतांचा वापर केला तर विजेचा वापर कमी होईल तसंच पाणीटंचाईचा प्रश्नही आपण बराचसा मार्गी लावू शकू.

**संरचना** : घराच्या बांदाकामात जेवढे नैसर्गिक आणि भेसळमुक्त घटक अधिक तेवढी बांधकामाची उपयुक्तता, टिकावूपणा आणि मजबूती अधिक.



घरातल्या छतासाठी धातू, सिमेंट-कॉंक्रिट किंवा कौलं यांचा वापर करणं कधीही चांगलं. कारण त्यांची विविध हवामानांत टिकण्याची क्षमता जास्त असते. त्यांच्या दुरुस्तीचा खर्चही फार नसतो व वारंवार करावा लागत नाही.

**आरेखन** : चांगल्या गृहप्रकल्पासाठी चांगलं आरेखन म्हणजेच आर्किटेक्चर अतिशय महत्त्वाची भूमिका बजावतं. पर्यावरणाला अनुकूल व आरोग्यदायी घरांसाठी अनेक बाबी महत्त्वाच्या असतात. यात बांधकाम साहित्याचा योग्य व वेळेत होणारा पुरवठा, बांधकामाची जागा चांगली असणं, योग्य हवामान याची काळजी घेणंही गरजेचं असतं.

घर बांधताना केवळ घराबाहेरचंच नव्हे तर घरातलं वातावरणही तिथे राहणाऱ्या लोकाच्या दृष्टीने कसं चांगलं व आरोग्यपूर्ण असेल याचा आरेखनात विचार केला जातो. घरातलं फ्लोअरिंग कसं असावं, भिंती कशा असाव्यात, प्लास्टर ऑफ पॅरिसचं काम करण्यात येत असेल तर ते किफायतशीरपणे कसं करावं या साऱ्याचा विचार करण्यात येतो.

**अंतर्गत सजावट** : घरातल्या अंतर्गत सजावटीचं काम करताना बहुतेकदा त्यातल्या आरोग्यकारी बाबींकडे दुर्लक्षच केलं जातं. सारं लक्ष केवळ घर आतून किती सुंदर दिसेल यावरच दिलं जातं. पण घरातल्या लोकांसाठी ते किती आरोग्यकारी आहे हे आधी बघायला हवं.

निरोगी गृहसजावटीसाठी घरात शुद्ध हवा खेळती राहिल याचा विचार करायला पाहिजे. सध्याच्या काळात तासनतास घरात शुद्ध हवा खेळती राहिल याचा विचार गृहसजावटीमध्ये केला पाहिजे. त्यामुळे घरातलं वातारणही आनंददायी आणि प्रसन्न राहतं. हेच वातावरण आपल्याला आरोग्यदायी ठेवण्यास मदत करतं.

घराच्या बांधकामात तसंच सजावटीतही ज्वलनशील तसंच हानीकारक रासायनिक पदार्थांचा कमीतकमी वापर होईल याची काळजी घेतली पाहिजे.

नैसर्गिक साधनसामग्रीचा पुरेपूर वापर केला तर वीज, पाणी आणि इतर नैसर्गिक साधनांचा वापरही कमी होतो. या इमारतींमधून जमा होणाऱ्या कचऱ्याचं प्रमाणही इतर इमारतींच्या तुलनेत कमी असतं.

ऊर्जेची गरज भागवण्यासाठी अपारंपरिक ऊर्जास्रोतांचा उपयोग करतानाच इमारतीमधल्या दरवाजे व खिडक्यांचं प्रमाण, त्यांचा आकार पुरेशी हवा खेळती ठेवण्याच्या दृष्टीने नियंत्रित केला जातो. त्यामुळे ऊर्जेची गरज कमी भासते. अशा इमारतीच्या बांधकामाचा व तिथे राहण्याचा खर्चही नेहमीच्या इमारतींच्या तुलनेत कमी येतो.

नैसर्गिक घटकांचा वापर करून पर्यावरणपूरक इमारती बांधल्या तर त्याचा फायदा सर्वांनाच होईल. एका आरोग्यदायी आणि स्वास्थ्यकारक आयुष्याची ही सुरुवात असेल.

●






Shashwat Group brings to you Shashwat Park
34 stunning towers of residential apartments with
wireless security systems that makes your dream
home secured from all kinds of thefts.
Book your new home at Shashwat park and stop
worrying about your house when you are away from it.

SHASHWAT Park
INTEGRATED TOWNSHIP WITH 34 RESIDENTIAL BUILDINGS
1 & 2 BHK Lifestyle Apartments

panorama/SP/01/13/ARIESMEDIA

Free kitchen trolley | Club house | Landscape Garden | Rain water harvesting system | Well equipped gymnasium | Meditation center
Jogging track | Wireless security systems | Library with diverse literature | Vastu approved construction | Ample car parking

Pick up van available behind Vaishali theater near Suman medical

A project by
SHASHWAT G|R|O|U|P

Call: 90110 27892 | 90110 97678 | 90110 15892 For more details: 022 - 6193 7604
Site : Shashwat park, Manjarli chowk, Opp. Deepali park, Badlapur (west) | Web:www.shashwathomes.com